**CNR NO : MHMM120259622017**

| | |
|---|---|
| **दाखल दिनांक** | : ०५.०८.२०१७ |
| **नोंदणी दिनांक** | : ०५.०८.२०१७ |
| **निकाल दिनांक** | : २२.०७.२०२६ |
| **कालावधी** | : ०८व. ११म. १७दि. |

**प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, माझगांव, यांचे न्यायालय, (न्यायालय क्रमांक ४६)**

(पीठासीन अधिकारी प्र. प्र. देशमुख)

**न्यायनिर्णय**

**(पारित दिनांक २२.०७.२०२६)**

**खटला क्र. ४६००८५२/पीडब्लु/२०१७.** **निशाणी क्र. १२**

**गु.र.क्र. ५५/२०१६ (आग्रीपाडा पो.स्टे.)**

महाराष्ट्र सरकार, तर्फे
पोलीस ठाणे अधिकारी,
आग्रीपाडा पो.स्टे..ठाणे
} **अभियोगपक्ष**

**सरकारतर्फे** : श्रीमती एस. डी. दळवी, सहाय्यक सरकारी अभियोक्ता.

**.. विरुध्द ..**

**१. सुनिल संजीव तोरसकर,**
वय:– ४० वर्षे, धंदा :– नोकरी,
**२. संजीव तोरसकर,**
वय:– ७० वर्षे, धंदा :– हिंदु,
**३. निलम संजीव तोरसकर,**
वय:– ६८ वर्षे, धंदा :– ––.
आरोपी क्र.१ ते ३ रा. मॉडर्न मिल कपांउड,
चाळ क्र.५, खोली क्र.६, के. के. मार्ग,
सातरस्ता, मुंबई.
**४. वैभवी विजय कासले,**
वय:– ४३ वर्षे, धंदा :– नोकरी.
रा.– ––
} **आरोपी**

**आरोपींतर्फे** : श्रीमती. फरहीन, विधीज्ञ.

**गुन्हा** : **भारतीय दंड संहिताचे कलम ४९८–अ, ३२३, ५०४ व ५०६ सहवाचन कलम ३४ अन्वये.**

## न्या य नि र्ण य

### भाग – अ

१. **गुन्ह्याचा तपशील :**

| | | |
|---|---|---|
| अपराध घडल्याचा दिनांक | : | दि. ११.०४.२०१३ ते दि. १९.०२.२०१६ |
| प्रथम खबर दिनांक | : | २०.०२.२०१६. |
| दोषारोप दाखल केल्याचा दिनांक | : | ०५.०८.२०१७. |
| दोषारोप निश्चित केल्याचा दिनांक | : | १९.०८.२०२०. |
| पुरावा नोंदविण्यास सुरुवात केल्याचा दिनांक | : | १६.०७.२०२६. |
| न्यायनिर्णयासाठी ठेवल्याचा दिनांक | : | xxxxxxxxxx |
| न्यायनिर्णयाचा दिनांक | : | २२.०७.२०२६. |
| शिक्षेच्या आदेशाची तारीख असल्यास | : | लागू नाही. |

### भाग – ब

२. **आरोपीचा तपशील :**

| आरोपी क्र. | आरोपीचे नाव | अटक केल्याचा दिनांक | जामीनावर सोडल्याचा दिनांक | गुन्ह्याचा तपशील | शिक्षा किंवा निर्दोष | शिक्षा कालावधी | खटला चालू असल्याचे दरम्यान कारागृहात असल्याचा कालावधी, फौ. प्र.सं. कलम ४२८ साठी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | सुनिल संजीव तोरसकर | फौ.प्र.सं. चे कलम ४१ अन्वये नोटीस दिली. | दिनांक ०५.०८.२०१७ | भा.दं.वि. चे कलम ४९८–अ, ३२३, ५०४, ५०६ सहवाचन कलम ३४ अन्वये व कलम ३७७ अन्वये. | निर्दोष | निरंक | लागू नाही |
| २. | संजीव तोरसकर | वरील प्रमाणे | वरील प्रमाणे | वरील प्रमाणे | निर्दोष | निरंक | लागू नाही |
| ३. | निलम संजीव तोरसकर, | वरील प्रमाणे | वरील प्रमाणे | वरील प्रमाणे | निर्दोष | निरंक | लागू नाही |
| ४. | वैभवी विजय कासले | वरील प्रमाणे | वरील प्रमाणे | वरील प्रमाणे | निर्दोष | निरंक | लागू नाही |

## भाग – क

**३.** **अभियोग पक्षाचे साक्षीदार/ बचाव पक्षाचे साक्षीदार/ न्यायालयाचे साक्षीदार असल्यास :**

**अ.** **अभियोग पक्षाचे साक्षीदार :**

| क्र . | नांव | पुराव्याचा प्रकार | निशाणी |
|---|---|---|---|
| १. | प्राची तोरसकर | खबर देणार | नि.क्र.९ |

**ब.** **बचाव पक्षाचे साक्षीदार** : आरोपींनी पुरावा दिला नाही.

**क.** **न्यायालयीन साक्षीदार** : निरंक.

**४.** **अभियोग पक्ष/बचाव पक्ष/न्यायालय यांचे दस्तास निशाणी बाबत यादी** :

**अ.** **अभियोग पक्षाचे निशाणी** : .

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | विवरण |
|---|---|---|
| १. | नि.क्र.१०/सा. क्र.१, | फिर्याद. |
| २. | नि.क्र.११/सा. क्र.१, | प्रथम खबर अहवाल. |

**ब.** **बचाव पक्षाचे निशाणी** : निरंक.

**क.** **न्यायालयाची निशाणी** :

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | विवरण |
|---|---|---|
| १. | नि.क्र.२ | दोषारोप. |
| २ | नि.क्र.३ ते ६ | आरोपींचे प्रतिकथन |

**ड.** **विशेष साहित्य** (**मटेरियल ऑब्जेक्ट**) : निरंक.

**अभियोग पक्षाची हकीकत थोडक्यात खालीलप्रमाणे आहे.**

**५.** फिर्यादीने दिनांक २०.०४.२०१६ रोजी पोलीस ठाणे आग्रीपाडा येथे अशी फिर्याद दिली की, दि.०६.०१.२०१३ रोजी तिचा आरोपी क्र. १ सोबत विवाह झाला. आरोपी क्र.२ ते ०४ हे आरोपी क्र.१ याचे नातेवाईक आहेत. विवाहानंतर ती आरोपींसोबत राहावयास गेली. विवाहानंतर, आरोपींनी तिचा किरकोळ कारणावरुन वेळोवेळी घरातून बाहेर काढण्याची धमकी देवून तिला शिवीगाळ व मारहाण करुन तिचा मानसिक व शारिरीक छळ केला. तसेच, आरोपी हे तिला तिचे वडीलांकडून पैसे आणण्यास सांगुन तिला मारहाण करीत असत. अशा प्रकारे आरोपींनी फिर्यादीचा शारिरीक व मानसिक छळ केला. सबब, फिर्यादीने आरोपींविरुध्द आग्रीपाडा पोलीस ठाणे येथे फिर्याद दाखल केली.

**६.** सदर फिर्यादवरुन पोलीस ठाणे, आग्रीपाडा येथे आरोपींविरुध्द भा.दं.वि. चे कलम ४९८–अ, ३२३, ५०४, ५०६ सहवाचन कलम ३४ अन्वये गुन्हा क्रमांक ५५/२०१६

नोंदविण्यात आला. तपासादरम्यान तपासणी अधिकारी यांनी साक्षीदारांचे बयाण नोंदविले,फिर्यादची वैद्यकीय प्रमाणपत्र प्राप्त केले व तपासाअंती आरोपींविरुध्द न्यायालयात भा.दं.वि. चे कलम ४९८–अ, ३२३, ५०४, ५०६ सहवाचन कलम ३४ अन्वये दोषारोपपत्र दाखल केले.

## संपरीक्षा आणि पुरावा

७. आरोपींविरुध्द भारतीय दंड संहिताचे कलम ४९८–अ, ३२३, ५०४, ५०६ सहवाचन कलम ३४ अन्वये शिक्षेस पात्र गुन्ह्यांचा आरोप निशाणी क्रमांक २ वर निश्चीत केला. आरोपींनी गुन्हा कबुल नसल्याचे कथन करुन संपरिक्षेची मागणी केली.

८. आरोपींविरुध्द गुन्हा सिध्द करण्यासाठी अभियोग पक्षातर्फे फिर्यादीस तपासले व लेखी पुरावे देखील सादर केले. अभियोग पक्षास पुरेशी संधी देऊनही इतर साक्षीदारांना पुराव्याकामी हजर केले नाही. सबब, निशाणी क्रमांक १ वर आदेश पारीत करुन अभियोगपक्षाचा पुरावा बंद करण्यात आला. आरोपींविरुध्द सबळ व परिपोषक पुरावा आढळुन आला नसल्यामुळे त्यांचे फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ३१३ अन्वये जबाब नोंदविण्यात आले नाही. या प्रकरणामध्ये दाखल झालेले कागदपत्रे व दोन्ही पक्षांचा युक्तिवाद ऐकल्यानंतर खालील मुद्दे विचारार्थ उपस्थित झाले व त्यांचे निष्कर्ष कारणमिमांसेसह देण्यात येत आहे.

| | **मुद्दे** | | **निष्कर्ष** |
|---|---|---|---|
| १. | दि. ११.०४.२०१३ ते दि. १९.०२.२०१६ पर्यंत, मॉडर्न मिल कपांउड, चाळ क्र.५, खोली क्र.६, के. के. मार्ग, सातरस्ता, मुंबई.येथे आरोपी यांनी एकमेकांचे संगनमताने, फिर्यादीचा, तिला तिचे वडीलांकडून पैसे | – | नकारार्थी. |

| | मुद्दे | | निष्कर्ष |
|---|---|---|---|
| | आणण्यास सांगून तिला मारहाण व शिवीगाळ करुन तिचा शारिरीक व मानसिक छळ करुन तिला क्रुरपणाची वागणूक दिली, आणि त्याव्दारे भारतीय दंड संहिताचे कलम ४९८–अ सहवाचन कलम ३४ अन्वये गुन्हा केला असे अभियोग पक्ष सिध्द करतो काय? | | |
| २. | उपरोक्त दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपींनी एकमेकांचे संगनमताने फिर्यादीस मारहाण मारुन इच्छापूर्वक दुखापत पोचविली, आणि त्याद्वारे भारतीय दंड संहिताचे कलम ३२३ सहवाचन ३४ अन्वये शिक्षेस पात्र गुन्हा केला ? | – | नकारार्थी. |
| ३. | उपरोक्त दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपींनी एकमेकांचे संगनमताने फिर्यादीस, शिवीगाळ करुन जाणीपुर्वक अपमान केला आणि ती सार्वजनिक शांततेचा भंग अथवा कोणताही अपराध करण्यास प्रवृत्त होईल अशा प्रकारे प्रक्षोभित केले आणि त्याव्दारे भारतीय दंड संहिताचे कलम ५०४ सहवाचन कलम ३४ अन्वये गुन्हा केला, असे अभियोग पक्ष सिध्द करतो काय? | – | नकारार्थी. |
| ४. | उपरोक्त दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपींनी एकमेकांचे संगनमताने फिर्यादीस, धमकी देवून फौजदारी पात्र धाकदपटशा केला, आणि त्याद्वारे भादंविचे कलम ५०६ सहवाचन कलम ३४ अन्वये शिक्षेस पात्र गुन्हा केला, असे अभियोगपक्ष सिध्द करतो काय? | | नकारार्थी. |
| ५. | काय आदेश ? | – | अंतिम आदेशाप्रमाणे |

**– : कारणमिमांसा :–**

**विचाराधीन प्रश्न क्रमांक १ ते नकारार्थी. करीता :**

९. प्रस्तुत प्रकरणात दोषारोप सिध्द करण्यासाठी अभियोग पक्षाने फिर्यादी प्राची तोरसकर अ. सा. क्र.१ हिला निशाणी क्र.९ अन्वये तपासले आहे. त्याशिवाय, अभियोग पक्षाने कागदोपत्री पुरावा म्हणजे फिर्याद निशाणी क्र.१० व प्रथम खबर अहवाल निशाणी क्र.११ वर दाखल केली. अभियोग पक्षाचा व बचाव पक्षाचा युक्तीवाद ऐकण्यात आला.

१०. फिर्यादी प्राची तोरसकर (अ.सा.क्र.१) हिने तिचे सरतपासात असे कथन केले की, आरोपी क्र.१ हा तिचा पती असून इतर आरोपी हे आरोपी क्र.१ याचे नातेवाईक आहेत. दि. ०६.०१.२०१३ रोजी तिचा आरोपी क्र.१ सोबत विवाह झाला. प्रस्तुत घटना केव्हा घडली हे तिला आठवत नाही, असे कथन केले आहे. आरोपींनी तिचा मानसिक व शारिरीक छळ केला, म्हणुन तिने फिर्याद दाखल केली नाही. तिने निशाणी क्र.१० ची फिर्याद दिली. फिर्यादी ही फिर्यादिवर तिची स्वाक्षरी असल्याचे मान्य करीत आहे, परंतु त्यातील मजकुराबाबत तिने पुर्णपणे अनभिज्ञता दर्शविली आहे. साक्षीदार क्र.१ ही अभियोग पक्षास पाठिंबा देत नसल्याने अभियोग पक्षाने तिचा उलटतपास घेतला. उलटतपासात सदर साक्षीदाराने आरोपींनी तिचा शारीरिक व मानसिक छळ केल्याने तिने फिर्याद दिल्याची बाब स्पष्टपणे नाकारली आहे. तसेच, तिचे फिर्यादमधील भाग 'अ' हा स्पष्टपणे नाकारला आहे. आरोपींतर्फे विधीज्ञ, यांनी घेतलेल्या उलटतपासात अ.सा. क्र.१ ही कबुल करते की, तिने व आरोपी क्र.१ याने कौटुंबिक न्यायालय, मुंबई येथे परस्पर संमतीने घटस्फोटासाठी अर्ज केला आहे. सदरचे प्रकरण न्यायालयाचे बाहेर आपसात मिटले आहे, त्यामुळे तिला आरोपींविरुध्द काहीही तक्रार नाही. सबब, तिला प्रकरण पुढे चालवायचे नसल्याचे सांगितले.

**११.** वरील पुराव्याचे सुक्ष्म अवलोकन केले. या प्रकरणात महत्वाची साक्षीदार क्र.१ फिर्यादी हीने तिचे साक्षीत आरोपींनी तिचा शारिरीक व मानसिक छळ करुन तिला क्रुरपणाची वागणूक दिली, ही बाब स्पष्टपणे नाकारली आहे. फिर्यादीने तिचे पुराव्यामध्ये आरोपींनी तिला मारहाण करुन शिवीगाळ व धमकी दिल्याबाबत अवाक्षरही काढले नाही. सबब, या प्रकरणात अभियोग पक्षाने सादर केलेल्या पुराव्याचे अवलोकन केले असता असा निष्कर्ष निघतो की, आरोपींनी फिर्यादीचा मानसिक व शारिरीक छळ करुन तिला क्रुर वागणूक दिली, तसेच, तिला मारहाण करुन शिवीगाळ व धमकी ही बाब सिध्द करण्यास अभियोग पक्ष पुर्णपणे अपयशी ठरले आहे.

**१२.** साक्षीदार क्र.१ ही महत्वाची साक्षीदार असून, प्रस्तुत प्रकरणात फिर्यादी अ.सा.क्र.१ व आरोपी क्र.१ यांनी कौटुंबिक न्यायालय, मुंबई येथे परस्पर संमतीने घटस्फोटासाठी अर्ज केला आहे तसेच, त्यांचेमध्ये तडजोड झालेमुळेच फिर्यादी अ.सा.क्र.१ अभियोग पक्षास सहाय्य करीत नसावी. तसेच इतर महत्वाचे साक्षीदार अभियोग पक्षाने तपासलेले नाहीत. अशा परिस्थीतीत फिर्यादीस आरोपींविरुध्द कोणतीही तक्रार नसल्यामुळे तसेच तिचा पुरावा तिने दाखल केलेल्या फिर्यादशी विसंगत असल्यामुळे हे न्यायालय या निर्णयाप्रत पोहचले आहे की, आरोपींनी फिर्यादीचा मानसिक व शारिरीक छळ करुन तिला क्रुर वागणूक दिली, तसेच तिला मारहाण करुन शिवीगाळ व धमकी दिली, ही बाब सिध्द करण्यात अभियोग पक्ष पूर्णपणे अपयशी ठरले आहे. याचा परिपाक म्हणजे आरोपींविरुध्द भारतीय दंड संहिताचे कलम ४९८–अ, ३२३, ५०४, ५०६ सहवाचन कलम ३४ चे निश्चित तात्विक अंग शाबीत करण्यात अपयशी झाल्याने मी मुद्दा क्र.१ ते ४ चे उत्तर नकारात्मक देत आहे.

**विचाराधीन प्रश्न क्रमांक ५**

**१३.** मुद्दा क्र. १ ते ४ चे नकारात्मक निष्कर्षास अनुसरुन हे न्यायालय खालील आदेश पारीत करीत आहे.

**– : आदेश :–**

**१.** आरोपी क्र.**१. सुनिल संजीव तोरसकर, २. संजीव तोरसकर, ३. निलम संजीव तोरसकर व ४. वैभवी विजय कासले,** यांना फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम २४८(१) अन्वये भारतीय दंड संहिताचे कलम ४९८–अ, ३२३, ५०४, ५०६ सहवाचन कलम ३४ अन्वये शिक्षेस पात्र गुन्ह्यांतुन निर्दोष मुक्त करण्यात येत आहे.

**२.** आरोपी क्र. १ ते ४ यांचे बंधपत्रे व जामीनपत्रे रद्द करण्यात येत आहे.

**३.** आरोपी क्र. १ ते ४ यांना निर्देशीत करण्यात येते की, त्यांनी फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७–अ प्रमाणे प्रत्येकी ₹१५,०००/– चा जामीन द्यावा.

**४.** न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात पारित व घोषित करण्यात आला.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by PRASAD PRABHAKAR DESHMUKH
Date: 2026.07.22 17:40:43 +0530

( प्र. प्र. देशमुख )

दिनांकः– २२.०७.२०२६

प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी,
४६वे न्यायालय, माझगांव, मुंबई.

Directly dictated on : 22.07.2026
Typed on : 22.07.2026
RRRT.

## प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, वरील न्यायनिर्णया मधील शब्द न शब्द मुळ निकालपत्रा प्रमाणे आहे.

लघुलेखकाचे नांव : रा. र. तेलवणे, लघुलेखक उ.श्रेणी.
न्यायालयाचे नांव : महानगर दंडाधिकारी, ४६वे न्यायालय, माझगांव, मुंबई.